International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.3 Jan – Feb 2023

# विधि संघर्षग्रस्त बालक या संकल्पनेचे विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नांदेड.
**Corresponding Author– डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
**DOI- 10.5281/zenodo.14870629**

**गोषवारा :-**

भारताने २०१५ साली बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा पारित केला या कायद्याचा स्विकार महाराष्ट्राने २००२ साली महाराष्ट्र बालन्याय (बालकांचे काळजी व संरक्षण) कायदा पारित करून या कायद्यात अंतर्भूत असलेल्या कलमानुसार कायद्याविरुद्ध कृत्य केलेल्या बालकास बाल गुन्हेगार, बाल अपचारी न म्हणता विधी संघर्ष ग्रस्त बालक असे म्हटले जाऊ लागले आणि बालगुन्हेगारी ही संकल्पना कालबाह्य ठरली आणि विधी संघर्ष ग्रस्त बालक ही संज्ञा मान्य करण्यात आली. विधी संघर्ष ग्रस्त बालके ही मोठ्या मोठ्या शहरांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतात मद्रास, दिल्ली, लखनऊ, कलकत्ता, बंगलोर या शहरात तसेच महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, सोलापूर, औरंगाबाद, नागपूर, मनमाड इत्यादी ठिकाणीही आढळतात तसेच रेल्वे जंक्शन परीसरातील औद्योगिक वस्त्या, गावे, व्यापाराची उलाढाल चालणारी नगरे इत्यादी ठिकाणीही गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे.

**बिज संज्ञा :-** विधि संघर्षग्रस्त बालक, विधी संघर्ष ग्रस्त बालकाचे वय, संकल्पना.

**प्रस्तावना :-**

कोणत्याही बालकाने कायद्याविरोधी जे कृत्य केले त्या बालकाला विधी संघर्षग्रस्त बालक असे म्हणतात शरीरशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ यांनी तर असे स्पष्ट केले आहे की सात वर्षापर्यंतचे बालके ही गुन्हा समजून करत नाही कारण त्यांना हा गुन्हा का करू नये याची कल्पनाच नसते एखादी कृती जरी त्याच्या हातून घडून आली तरी ते त्याने जाणीवपूर्वक केलेले नसते म्हणून विधी संघर्ष ग्रस्त बालकाची वयोमर्यादा ठरवताना जगामध्ये प्रत्येक देशाने वेगवेगळी वयोमर्यादा ठरविलेल्या आहेत भारताचा विचार करता बालन्याय अधिनियम (काळजी व संरक्षण) २०१५ या कायद्यानुसार अठरा वर्षापर्यंतच्या बालकाला विधी संघर्ष ग्रस्त संबोधण्यात आलेले आहे पण जगण्य (henius crime) अपराध केल्यास त्याला सोळा वर्षापर्यंतच विधी संघर्षग्रस्त बालक समजण्यात येते व सोळा वर्षांपुढील बालकास प्रौढ समजण्यात येते बौद्धिक समज न आलेल्या बालकांची गुन्हेगारी संदर्भातील संकल्पना विसाव्या शतकामध्ये उदयास आली त्याआधी बालकांना गुन्ह्याचे स्वरूप पाहूनच शिक्षा केली जात असे व त्यांचे वय कुठेही ग्राह्य धरल्या जात नसे असे असले तरी आधुनिक काळामध्ये विधी संघर्ष ग्रस्त बालकांना सुधारण्यावरच आणि त्यांचे पुनर्वसन व एकात्मिकरण करण्यावरच भर देण्यात आलेला आहे ज्या ज्या बालकांचे वर्तन हे उनाड, उचलेगिरी, ऊनमार्गी, बेशिस्त स्वरूपाचे असते सातत्याने वर्तन असेच राहिले तर हे त्याचे वर्तन बेकायदेशीर वर्तनात रूपांतरित होते समाजातील धार्मिक बंधने, रूढी, चालीरीती, परंपरा, शिस्तीबाबतचे नियम, नागरिकांचे हक्क इत्यादीच्या विरोधी वर्तन करणे म्हणजे गुन्हेगारी समजली जाते व ते करूच नये पण बालकांचे ते करून पाहण्याकडे जास्त कल असतो त्याची कारण ते का करू नये हे त्यांना समजत नाही त्यांची बौद्धिक परिपक्वता तेवढी नसते अशा विधी संघर्ष ग्रस्त बालकांचे वयाचा अभ्यास करताना आपल्याला प्रत्येक देशामध्ये वेगवेगळे वयोमर्यादा दिसते व त्या देशातील विविध राज्यांमध्ये सुद्धा वेगवेगळी वयोमर्यादा त्या राज्यांनी ठरवलेली आहे जसे की अमेरिका व युरोपमध्ये १६ ते २१ वयोमर्यादा आहे तर आशियामध्ये ती १५ ते २० वयोमर्यादा ठरवण्यात आली आहे तर युरोप, रशिया आणि अमेरिका या देशांमध्ये बऱ्याच राज्यांमध्ये १८ हे वय ग्राह्य धरले जाते भारतामध्येही बाल न्याय अधिनियम २००० या कायद्यानुसार विधी संघर्ष ग्रस्त बालकाचे वय हे १८ वर्षे ठरविण्यात आले होते पण २०१५ च्या अधिनियमांमध्ये सुधारणा होऊन विधी संघर्षग्रस्त बालकांनी जगन्य अपराध केल्यास त्याला सोळाच वर्षे ग्राह्य धरण्यात येते व सोळा वर्षापुढे त्याला प्रौढ म्हणून वागवले जाते वरील वयोमर्यादा असणाऱ्या बालकांच्या हातून समाजविरोधी जे कृत्य घडते त्यालाच सर्वसाधारण भाषेमध्ये बालगुन्हेगार किंवा विधी संघर्ष ग्रस्त बालक असे संबोधण्यात येते ही समाजविरोधी किंवा कायदा विरोधी कृती कोणती हे त्या त्या देशांनी त्यांच्या कायद्यानप्रमाणे ठरविले आहे आणि म्हणूनच एखादे

कृत्य एका देशात गुन्हा समजल्या जाते तर तेच कृत्य दुसऱ्या देशांमध्ये कायदेशीर ठरविल्या जाऊ शकते.

**उद्दिष्टे :-**

1. विधि संघर्षग्रस्त बालकांच्या वयोमर्यादेचा अभ्यास करणे.
2. विधि संघर्षग्रस्त बालकांविषयी विविध शास्त्रातील तज्ञांच्या मतांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्त्रोतांचा वापर करून शोधनिबंध लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, दैनिक लेख, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**विधि संघर्षग्रस्त बालकांच्या व्याख्या :-**

**१ न्युमेयर यांच्या मते :-**

कायद्याने निर्धारित केलेल्या वयापेक्षा कमी वय असलेली व्यक्ती की ज्या व्यक्तीचे वाईट वर्तन समाजविरोधी व कायद्याचे उल्लंघन करणारे असते, तिला विधि संघार्षित बालक असे म्हटले जाते.

**२ डॉ. सेठना यांच्या मते :-**

एखाद्या देशातील कायद्याने नमुद केलेल्या वयोमर्यादेच्या आतील मुलांनी चालू कायद्याच्या विरोधी कृत्य करणार्या बालकास विधि संघर्षग्रस्त बालक असे म्हणतात.

वरील व्याख्यांवरुन आपल्याला विधी संघर्षग्रस्त बालक कोणाला म्हनावे याचा अर्थ स्पष्ट होतो. भारतातील विविध सामाजिक समस्यांबरोबर आज विधि संघर्षग्रस्त बालकाच्या समस्येने सर्वांचे लक्ष वेधले आहे. सामाजिक विघटनच्या प्रक्रियेबरोबरच विधि संघर्षग्रस्त बालकाची समस्या वाढत चालली आहे. सामाजिक प्रदूषणाचे हे एक लक्षण आहे. इ.स. १७८८ पासून इंग्लंडमध्ये आणि इ.स. १८५० पासून भारतात प्रौढ गुन्हेगार व बाल गुन्हेगार यांच्यात सर्वप्रथम भेद करण्यात आला आणि त्यांना दिल्या जाणार्या शिक्षेतही दोन वेगळया प्रणाली स्वीकारण्यात आल्या. गुन्हेगारीच्या संदर्भात बालकाची व्याख्या करणे एक कठीण कार्य आहे. विधि संघर्षग्रस्त बालकाची व्याख्या करण्याअगोदर बालक कुणाला म्हणावे व बालकांच्या कोणत्या व्यवहाराला गुन्हा म्हणावा हे निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

**विधि संघर्षग्रस्त बालक संबंधीत विविध शास्त्रातील तज्ञांची मते :-**

**१ समाजशास्त्रज्ञ :-**

समाजशास्त्रज्ञ समजतात की वय नाही तर मुलाची वागणूक अपराधाचे कारण असते. गुंडागर्दी करणे, वाईट लोकांची संगत मिळणे, अश्लील भाषेचा प्रयोग करणे, आईबापांचे न मानणे वगैरे गोष्टी मुलांना अपराधी बनवतात. सामाजिकदृष्ट्या शाळेतून पळून येणे हा ही अपराध समजला जातो, परंतु कायद्याच्या दृष्टीने हा अपराध नाही.

**२ मानव वंश शास्त्रज्ञ :-**

मानव वंश शास्त्रज्ञ आणि शरीर वैज्ञनिक समजतात की अपराधाची प्रवृत्ती ही आनुवंशिक, मुलाच्या शरीर रचनेनुसार आणि त्याच्या जातिधर्मावर अवलंबून असते. एकसारखी शारीरिक रचना असलेले लोक एकसारखे अपराध करतात, आणि गुन्हेगार जातींशी संबंध असलेले पिढ्यान पिढ्या गुन्हेगार असतात. त्यांच्यामध्ये बहूतेक वेळा एकसारखीच अपराधाची प्रवृत्ती असते.

**३ मानसशास्त्रज्ञ :-**

मानसशास्त्रज्ञांच्या मते अपराधी प्रवृत्ती वंशावर किंवा शरीरचनेवर अवलंबून नसते. या गोष्टींचे भावना आणि आकांक्षा यांच्याशी काहीही थेट नाते नसते. मूल ज्या वातावरणात वाढते ते वातावरण ही गुन्हेगारी प्रवृत्ती असण्याचे कारण नसते. एकाच परिस्थितीत आणि एकाच कुटुंबात वाढलेले सर्व भाऊ-बहीण गुन्हेगार बनत नाहीत.

**निष्कर्ष :-**

विधी संघर्ष ग्रस्त बालकांचे वयाचा अभ्यास करताना आपल्याला प्रत्येक देशामध्ये वेगवेगळे वयोमर्यादा दिसते व त्या देशातील विविध राज्यांमध्ये सुद्धा वेगवेगळी वयोमर्यादा त्या राज्यांनी ठरवलेली आहे जसे की अमेरिका व युरोपमध्ये १६ ते २१ वयोमर्यादा आहे तर आशियामध्ये ती १५ ते २० वयोमर्यादा ठरवण्यात आली आहे तर युरोप, रशिया आणि अमेरिका या देशांमध्ये बऱ्याच राज्यांमध्ये १८ हे वय ग्राह्य धरले जाते भारतामध्येही बाल न्याय अधिनियम २००० या कायद्यानुसार विधी संघर्ष ग्रस्त बालकाचे वय हे १८ वर्षे ठरविण्यात आले. विधी संघर्ष ग्रस्त बालकांकडून घडणाऱ्या गुन्हेगारीच्या पाठीमागे अनेक मानसशास्त्रीय तसेच सामाजिक कारणे असतात. भावनात्मक बेतालपणा, भीती, असुरक्षितता, अपराधीची भावना (गिल्ट) इत्यादींमुळे मनात निर्माण होणारे गंड (कॉप्लेक्स) व विकृतीची वाढ यांमुळे मुले गुन्हेगार बनू शकतात. लहानपणी जडलेले मानसिक रोग, मंदबुध्दी, अपंगत्व यांमुळे मुलांच्या स्वभावात विकृती येते. गुन्हेगारी बहुतांशी आनुवंशिक आहे का याबद्दल अजून संशोधन चालू आहे. घर, सभोवातालचे वातावरण, शाळा ह्या ठिकाणी घडणाऱ्या चांगल्या-वाईट सर्वच घटनांचा प्रभाव मुलांवर पडत असतो. आई-वडिलांच्या प्रेमाचा अभाव, त्यांचे आपापसांतील बिघडलेले संबंध, कडक शिस्त अगर जास्त मोकळे वातावरण, फाजिल लाड, दारिद्रय अशांसारख्या गोष्टींचा मुलांच्या मनावर विकृत परिणम होतो. देशातील आर्थिक व राजकीय परिस्थितीही ह्या गुन्हेगारीस कारणीभूत ठरते.

**संदर्भ :-**


1. Unicef, Right Of The Child, Geneva Convention, १९२४.
2. अॅड. एस. के. कॉल [२०२१], बाल न्याय, युनिव्हर्सल लॉ हाऊस जळगाव [महाराष्ट्र]
3. डॉ. इंदिरा खडसे [२०१८] बालविकासशास्त्र, हिमालया पब्लिशिंग हाऊस,मुंबई
4. डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे,[२०१७] भारतातील बाल हक्कांची : स्थिति आणि आव्हाने, Ayushi International Interdisciplinary Research General [Aiirj] latur.
5. डॉ. राजेंद्र फकिरा बगाटे [१ फेब्रुवारी २०२०] 'विधी संघर्षित बालक : कारणे आणि सुधारणा' Vidyavarta International Multilingual Research Journal miraj.
6. तरुण भारत दैनिक वृत्तपत्र, दि.२९/०१/२०१८ 'गुन्हेगारीत बालकांचा वाढता सहभाग चिंताजनक'.
7. प्रा. कु. सरोज यादवराव लखदिवे [२०१९], बाळगुन्हेगारी एक सामाजिक समस्या, संशोधन शिल्प Gurukul International Multi-Disciplinary Research General [Gjmrj]
8. महाराष्ट्र टाइम्स २७ जुलै २०१४ 'बालगुन्हेगार वय महत्त्वाचे कि गुन्हा'.
9. महाराष्ट्र टाईम्स ११ डिसेंबर २०१६ 'बाल गुन्हेगारी मोठी होतेय'.
10. महाराष्ट्र टाईम्स १९ नोव्हेंबर २०१३ बालगुन्हेगार नव्हे विधीसंघर्षग्रस्त बालक.